## कृषि यंत्रे व शक्ती विभाग,
## कृषि अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय, दापोली

**नेहमी विचारली जाणारी प्रश्नावली-**

**१. डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाने भात शेतीसाठी कोणती अवजारे विकसीत केलेली आहेत ?**

- डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाने भात शेतीसाठी खालीलप्रमाणे अवजारे विकसीत केलेली आहेत.

| अ.क्र. | अवजाराचे नावं | उपयोग |
|---|---|---|
| १. | वैभव विळा- | भाताची कापणी जमिनीलगत करण्यासाठी |
| २. | पंकज चिखलणी अवजार | भात शेतीमध्ये चिखलणीकरण्यासाठी बैलचलित अवजार |
| ३. | धस्कटे काढण्याचे साधन | भात कापणीनंतर शेतात भाताची धस्कटे काढण्याकरिता |
| ४. | कोनोविडर- | ओळीत लावणी केलेल्या भात पिकातील तण नियंत्रणाकरीता |
| ५. | जपानी कोळपे | ओळीत लावणी केलेल्या भात पिकातील तण नियंत्रणाकरीता |
| ६. | अंकुर दातेरी फावडे | तण काढण्यास, पाट, आळी, वरंबे, भर देणे आणि स-या तयार करण्यासाठी |
| ७. | स्वयंचलित भात कापणी यंत्र | भात किंवा गहू यासारखे पक्व झालेले पिक कापणे व एका बाजूला अंथरणे याकरीता इंजिनचलित यंत्र |
| ८. | शुन्य मशागत पेरणी यंत्र | भात पिक कापल्यानंतर मशागत न करता वाल पेरणीकरीता |
| ९. | इनव्हरटेड चेन कनव्हेअर प्रकारचे भात मळणीयंत्र | भात मळणी व अखंड पेंढा करीता विद्युतचलित यंत्र |

**२. डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाने फळ पिकांसाठी कोणती अवजारे विकसीत केलेली आहेत ?**

- डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाने फळ पिकासाठी उपयुक्त खालीलप्रमाणे अवजारे विकसीत केलेली आहेत.

| अ.क्र. | अवजाराचे नावं | उपयोग |
|---|---|---|
| १. | नुतन आंबा झेला | देठासहित आंबा फळ काढण्याकरीता |
| २. | नविन आंबा झेला | देठासहित आंबा फळ काढण्याकरीता |
| ३. | कोकण बहुविध फळ काढणी यंत्र | काजू, आंबा, कोकम इ. फळे झाडावरुन काढणेसाठी |
| ४. | अतुल चिकू झेला | परिपक्व चिकू तसेच काजू, काजू बोंडे, बोरे, लिंबू, कोकम आणि आवळा ही फळे काढण्याकरीता |
| ५. | नारळ सोलणी अवजार | सुकलेल्या नारळाचे सोडणे सोलण्याकरीता |
| ६. | अमर बांडगुळ कटर | फळ झाडांवरील बांडगुळे काढणेकरीता |
| ७. | काजू कात्री | वाफवलेली काजू बी सोलण्याकरीता हस्तचलित अवजार |
| ८. | निमस्वयंचलित काजु बी सोलणी यंत्र | काजु बी सोलणीकरीता विद्युतमोटारवर चालणारे यंत्र |

| | | |
|---|---|---|
| ९. | हिरवे काजू बी सोलणी अवजार | ओली काजू बी सोलण्यासाठी हस्तचलित अवजार |
| १०. | विपुल काजू बोंडाचा रस काढणी यंत्र | काजूबोंडापासून रस काढण्यासाठी |
| ११. | सुपारी सोलणी यंत्र (हस्तचलित) | सुपारी सोलणीकरीता हस्तचलित यंत्र |
| १२. | सुपारी सोलणी यंत्र (पदचलित) | सुपारी सोलणीकरीता पदचलित यंत्र |
| १३. | सुपारी सोलणी यंत्र (विद्युत मोटरचलित) | सुपारी सोलणीकरीता विद्युत मोटरचलित यंत्र |
| १४. | सुपारी फाळसटणी यंत्र | ओल्या सुपारीची फाळसटणी करण्यासाठी |
| १५. | ट्रॅक्टरचलित हायड्रोलिक एलेव्हेटर- | फळ बागेतील झाडांच्या फांदया तोडणे, उंच झाडांची जवळून फवारणी करणे, फळ काढणी, बागेची साफसफाई व तत्सम कामे या यंत्राव्दारे केली जातात. |

**३. डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाने भात शेती व फळ पिकांव्यतिरिक्त इतर कोणती अवजारे विकसीत केलेली आहेत ?**

\-

| अ.क्र. | अवजाराचे नावं | उपयोग |
|---|---|---|
| १. | स्वस्तीक अवजार | भुईमुगाला भर देण्यासाठी तसेच तण काढण्यासाठी |
| २. | कोरडवाहू शेती कोळपे | कोरडवाहू शेतीतील तण काढण्यासाठी |
| ३. | सुलभ समतल रेषा मार्कर | उंच सखल जमिनीवर समतल रेषा काढण्यासाठी |

**४. नारळाच्या झाडावर चढण्याकरीता कोणते सोपे तंत्रज्ञान उपलब्ध आहे ?**

\- नारळाच्या झाडावर चढण्याकरीता श्रमविज्ञान आधारीत तामिलनाडू कृषि विद्यापीठाव्दारे विकसीत नारळ शिडी याशिवाय महामुनी अॅग्रो, जयसिंगपुर यांची नारळ शिडी यासारखे तंत्रज्ञान उपलब्ध आहे.

**५. डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ विकसीत अवजारांची किंमत किती आहे?**

डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ विकसीत अवजारांची किंमत खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कृषि अवजाराचे नांव | किंमत |
|---|---|---|
| १. | वैभव विळा | रु. ४०/- |
| २. | काजू बी सोलण्याची कात्री | रु. २२०/- |
| ३. | अमर बांडगुळ कटर | रु. २२५/- |
| ४. | अंकुर दातेरी फावडे | रु. १२०/- |
| ५. | अतुल चिकू झेला | रु. १५०/- |
| ६. | नुतन आंबा झेला | रु. १३०/- |
| ७. | खणती | रु. ७०/- |
| ८. | पंकज चिखलणी अवजार | रु. ६०००/- |
| ९. | कोरडवाहू शेती कोळपे | रु. ९५०/- |
| १०. | जापानी कोळपे | रु. ११५०/- |
| ११. | स्वस्तीक अवजार | रु. ७४०/- |
| १२. | कोनोविडर | रु. ११७५/- |
| १३. | सुलभ समतल आरेखन यंत्र | रु. ७३०/- |
| १४. | विपुल काजू बोंडाचा रस काढण्याचे यंत्र | रु. ६,०००/- |
| १५. | नारळ सोलणी यंत्र | रु. २४५/- |
| १६. | इनव्हरटेड चेन प्रकारचे भात मळणी यंत्र | रु. ४६,०००/- |
| १७. | निमस्वयंचलित काजू बी फोडणी यंत्र | रु. ४५,०००/- |
| १८. | ट्रॅक्टरचलित फळ काढणी यंत्र | रु. ५.२८ लक्ष (प्रति नग, ट्रॅक्टर वगळून) |